# इपिलेप्सी शिबिरात १९३ रुग्णांना नवसंजीवनी

## ३३ तज्ज्ञ डॉक्टरांद्वारे उपचार : तीन महिन्यांची औषधी मोफत

**जळगाव :** राष्ट्रीय आरोग्य अभियान, इपिलेप्सी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा रुग्णालयात रविवारी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत आयोजित मोफत इपिलेप्सी शिबिरात मिरगीच्या १९३ रुग्णांवर मुंबई, औरंगाबाद आणि जळगावच्या ३३ तज्ज्ञ डॉक्टरांनी उपचार केले.

आरोग्य विभागाकडे ग्रामीण भागातील २२५ व शहरी भागातील ९३, अशी एकूण ३१८ मुले मिरगी, आकडी, फेफरे (इपिलेप्सी)च्या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांची नोंदणी करण्यात आलेली होती. शिबिरापूर्वी छोटेखानी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

अध्यक्षस्थानी आमदार सुरेश भोळे होते. इपिलेप्सी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.निर्मल सूर्या, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजकुमार सूर्यवंशी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.श्यामसुंदर निमगुडे, राज्यस्तर कार्यक्रम अधिकारी विनोद मेघे, फारुक शेख आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ.सूर्या यांनी इपिलेप्सी रुग्णांच्या उपचारासाठी शासनाने १ कोटी रुपये मंजूर केले आहेत. जिल्हा रुग्णालयात सिटी स्कॅन आणि एमआरआय आणण्यासाठी आमदार सुरेश भोळे यांनी प्रश्न मांडावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



डॉ.निर्मल सूर्या यांना रुग्णांची माहिती देताना डॉ.राजकुमार सूर्यवंशी.

### आरोग्य मंत्र्यांकडे पाठपुरावा करणार

आमदार सुरेश भोळे म्हणाले, पूर्वी अगदी छोट्या आजारांसाठी जळगाव जिल्ह्यातील रुग्णांना औरंगाबादला जावे लागत होते. मात्र जळगावात आता तज्ज्ञ डॉक्टर व सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. जिल्हा रुग्णालयात सिटीस्कॅन व एमआरआय मशीन आणण्यासाठी आरोग्य मंत्र्यांकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. आरोग्य विभागाच्या सुविधांची माहिती रुग्णांनी करून घ्यावी. माहिती न समजल्यास डॉक्टरांना विचारावे, असे आवाहनही त्यांनी केले.

### प्रादेशिक मिरगी क्लिनिकचे उद्घाटन

जिल्हा रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागातील प्रादेशिक मिरगी क्लिनिकचे व इपिलेप्सी शिबिराचे आमदार भोळे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या शिबिराच्या निमित्ताने जिल्हा रुग्णालयात स्वच्छता करण्यात आली होती. त्याचप्रमाणे अनेक महिन्यांपासून बंद असलेली शौचालये रविवारी सुरु करण्यात आली होती.

### जनजागृतीसाठी 'एमको'चे सहकार्य

या शिबिराच्या जनजागृतीसाठी रविवारी सकाळी जिल्हा रुग्णालय, पांडे डेअरी चौक, काव्यरत्नावली चौक, अजिंठा चौफुली, टॉवर चौकात पथनाट्ये सादर करण्यात आली. शिबिराच्या जनजागृतीसाठी औद्योगिक वसाहतीतील एमको कंपनीच्या वतीने सहकार्य करण्यात आले. शिबिरामध्ये ० ते ६ वयोगटातील ५३, ६ ते १८ वयोगटातील ८३ आणि १८ च्या पुढील वयोगटातील ५७ मिरगीच्या रुग्णांवर ३३ डॉक्टरांनी उपचार, समुपदेशन केले. रुग्णांना तीन महिन्यांची औषधी मोफत देण्यात आली.

---

# भारत विकास परिषदेचे

बळीराजा